Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I1VXIIIP0005

e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
JAN-2025
Issue–I, Volume–XIII

# नोकरदार उच्चशिक्षीत महिलांवर कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक शारीरिक, आर्थिक व लैंगिक छळ आणि कायदयाची सुरक्षा – एक अभ्यास

**सुधा किशन पवार**
संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
Emaill ID : sudhachavanr@gmail.com

**डॉ. वाय.व्ही. पवार**
सहाय्यक प्राध्यापक
फोस्टर डेव्हलपमेंट कॉलेज ऑफ एज्यूकेशन, शिवाजीनगर, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :-**

चूल आणि मूल करणं अशी सिमीत संकल्पना खरतर स्त्रीबाबतची कधीच पुसली गेली आहे. सुरुवातीच्या काळात आपल्या कुटूंबाला आर्थिक पाठबळ निष्ठा या उददेशाने स्त्रीया घराबाहेर जाऊन काम करु लागल्या. आपापले व्यवसाय करु लागल्या. परंतु काळानुरुप तंत्र आणि यंत्राच्या बदलत्या काळात स्त्रिया विविध क्षेत्रात आज अगदी आघाडीवर काम करत आहे. आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवीत आहेत. स्त्री पुरुष जेव्हा एकत्र काम करतात त्या कामाच्या ठिकाणी खरंतर कोणताही भेदभाव न राहता एक व्यक्ती म्हणून त्या ठिकाणी त्याला सुरक्षित आणि विश्वासाई वाटणं हे अत्यंत गरजेच असतं परंतु या अडथळयाची शर्यत पार करताना दुर्देवानं स्त्रियांना अनेक समस्यांना आणि संकटांना सामोरं जावं लागतं यापैकी एक अत्यंत गंभीर समस्या म्हणजे कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारा मानसिक छळ या स्वरूपात, या प्रकारे नोकरदार सुशिक्षीत महिलांवर कामाच्या ठिकाणी अन्याय हा होत असतो. सदर शोधनिबंध मध्ये नोकरदार स्त्रियांवर कार्यस्थळी होणारा अन्याय त्याचे स्वरूप, प्रकार, कायदेशीर सुरक्षा काय आहे? ; या अभ्यास केला गेला आहे.

**संशोधनाची उदिदष्टये :-**

1) नोकरदार उच्चशिक्षीत स्त्रियांवर कामाच्या ठिकाणी होणाऱ्या मानसिक व शारीरिक छळाचा आढावा घेणे.
2) नोकरदार उच्चशिक्षीत स्त्रियांवर कामाच्या ठिकाणी होणाऱ्या आर्थिक व लैंगिक छळांचा आढावा घेणे.
3) कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाचे महिलांचे जीवनात होणाऱ्या दुष्परिणामाचा अभ्यास करणे.
4) कामाच्या ठिकाणी उच्चशिक्षीत नोकरदार स्त्रीयावर होणाऱ्या छळा विरोधात भारतीय राज्यघटनात्मक उपाययोजना व इतर कायदेशीर उपाययोजनाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गरज :-**

भारतीय समाजात लिंग या विषयक दृष्टीकोनातून विविध क्षेत्रात महिलांवर अत्याचार होत आहेत. पुरुषप्रधान समाज अवस्थेत महिलांना एक 'स्त्री' म्हणून दिली जाणारी वागणूक अन्यायकारक आहे. स्त्रियांवर होणारा अन्याय समाजातील सर्वच् क्षेत्रात होताना दिसून येतो याला कामाचे ठिकाण सुध्दा अपवाद राहिले नाही. आज शिक्षणाच्या संधीमुळे स्त्री कुटूंबाबाहेर पडून नोकरी व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनत आहे. कुटूंबाला आर्थिक हातभार लावत आहे. परंतु येथे आज स्त्रिया शैक्षणिक दृष्ट्या स्वावलंबी जरी

झाल्या तरी तिच्यावरील अन्याय मात्र कमी होताना दिसुन येत नाही. कामाच्या ठिकाणी सहकारी पुरुषांकडून स्त्रीचा मानसिक, शारीरिक व लैंगिक छळ होताना दिसुन येत आहे. कार्यस्थळी असणाऱ्या वरीष्ठ महिलांकडूनही महिलांचा मानसिक, शारीरिक छळ होतांना दिसुन येतो. महिला ज्या ठिकाणी नोकरी करतात त्या ठिकाणी स्त्रियांना वेगवेगळ्या स्वरुपात अन्याय सहन करावा लागत आहे. जसे अपमान करणे, निंदा, टोमणे मारणे, टीका करणे असभ्य भाषेत बोलणे, असहकार्य, अडवणुक करणे, संकटात टाकणे, धमकावणे, भीती घालणे, अस्वस्थ करणे, दहशत निर्माण करणे, आर्थिक व लैंगिक शोषण करणे, जास्त काम देणे व काम नाकारणे, कार्यालयात उशीरा थांबण्यास सांगणे अशा विविध मार्गाने महिलांना कामाच्या ठिकाणी अन्यायाला सामोरे जावे लागते, तिला जाणीव पूर्वक त्रास दिला जातो, यामुळे स्त्रियांच्या जीवनात अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. जसे स्त्रियांना आपण आवाज उठवू शकत नाही या भावनेतून न्यूनगंड तयार होऊ शकतो. छळामुळे अपराधीवृत्ती निर्माण होते, सतत दबावाखाली राहतात, स्व्त:ला असूरक्षित समजतात. सततच्या त्रासामुळे मानसिक संतुलन बिघडून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले जाऊ शकते, अनेक स्त्रिया नोकरी सोडतात, आर्थिक नुकसान होऊन करिअर संपुष्टात येते. अनेक वेळा कुटूंबांतर्गत ताण-तणावाला सामोरे जावे लागते. या पार्श्वभुमीवर आजच्या उच्चशिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना कामाच्या ठिकाणी महिला सुरक्षित राहण्यासाठी कायदेशीर तरतुदी कोणते आहेत. भारतीय राज्यघटना महिला आयोग, विशाखा मार्गदर्शक तत्त्वे, कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळ अधिनियम 2013 नुसार कोणकोणत्या विविध उपाययोजना केल्या गेल्या आहेत याविष्यी जाणीव जागृती होणे ही आधुनिक काळाची गरज बनली आहे. महिलांना समानता, समान सहभाग, कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जावू नये. त्यांच्या प्रतिष्ठेला अपमानास्पद वागणूक दिली जावू नये. त्यांच्यावर त्या 'स्त्री' आहे या कारणामुळे कोणताही स्वरुपचा अन्याय होऊ नये यासाठी असे भारत सरकारने कायदयांची सुरक्षा ही विदयार्थ्यांना, समाजातीलच दिलेले प्रत्येक घ्तटकांना (स्त्री-पुरुषांना) माहित असावे म्हणून या संशोधन समस्येची गरज आहे असे संशोधकाला वाटते.

**संशोधन समस्येचे महत्व :-**

हिंसामुक्त जीवन जगणे हा प्रत्येक स्त्रीचा मानवी हक्क आहे. कामांच्या ठिकाणी महिलांवर होणारा मानसिक शारीरिक आर्थिक अत्याचार हा तिच्या मानवी अधिकाराचा विषय आहे. आणि तिच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारा दाखलपात्र विषय आहे. कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचारांविरुध्द जरी महिलांना संरक्षण देणारे कायदेशीर तरतुदी चांगले असले तरी त्याची अंमलबजावणी मात्र काटेकोरपणे व्हायला हवी. स्वातंत्र्यानंतरच्या काळात महिलांची प्रतिष्ठा मान-सन्मानाची जपणुक करणारे अनेक कायदे झाले. भारताच्या राज्यघटनेने महिलांचा समानतेचा मुलभूत हक्क मान्य केला. महिला व अनेक दुर्बल घटकांना संरक्षण सवलतीशिवाय वेळोवेळी कायदे करण्याची तरतूदही घटनेत करण्यात आली कायदा ह जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यात महत्त्वाचा ठरतो हे सत्य असले तरीही विषमता दारिद्रय, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती पुरुष प्रधानता, पितृसत्ताक पध्दती, जातीभेतद व द्वेष, धार्मिक ताणतणाव, मानसिकता अशा कित्येक कारंणानी घटनेनी दिलेली समानता प्रत्यक्षात यायला मात्र अनंत अडचणी निर्माण होतात महिलांनाही त्यांचा न्याय मिळावा हक्क मिळायला हवा म्हणून महिलांसाठी विविध कायदे करण्यात आले घटनेच्या 15 व्या अनुच्छेदानुसार, सरकारने आपल्या नागरिकांमध्ये लिंग आधारीत मतभेद करण्याची मनाई केली. पण आजही महिला

त्यासाठी दाद मागत आहेत. महिलांसाठी अनेक कायदे घटनेत नमुद आहेत. मात्र नुसते कायदे आहेत म्हणून चालणारे नाही तर त्यांची अंमलबजावणीही व्हायला हवी. समाजातील प्रत्येक महिलेला तिचे समाजातील महत्व अधिकार व हक्क यांची माहिती असायला हवी. नौकरदार महिलांनाही त्यांच्या संदर्भात वेळोवेळी केलेल्या कायदयांची माहिती असायला हवी. त्यांना कार्यस्थळी काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांनी या कायदयाच्या आधारे सोडवायला हव्यात या पार्श्वभुमीवर नोकरदार महिलांसाठी, त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायदयांची माहिती उचच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये व समाजातील प्रत्येक या संरक्षणात्मक कायदयाविषयी जाणीव जागृती व्हावी या दृष्टीकोनातुन हया हे संशोधन समस्येचे महत्त्व वाटत आहे.

**कामाच्या ठिकाणी होणाऱ्रा स्त्रीयांच्या छळाचे प्रकार :-**

आजच्या आधुनिक समाजात स्त्री नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडु लागली ज्या ठिकाणी काम करते त्या ठिकाणी तिला विविध अन्यायाला सामोरे जावे लागते. त्या ठिकाणी सहकाऱ्याकडून केवळ स्त्री आहे म्हणून विविध प्रकारे छळ केला जातो. अशा छळांचे मानसिक छळ, शारीरिक छळ, आर्थिक छळ व लैंगिक छळ असे चार प्रकार पाडता येतात.

1) **मानसिक छळ :-** स्त्रीयांना मानसिक व भावनिक पातळीवर यातना किंवा वेदना होतील यासाठी केलेले वर्तन म्हणजे मानसिक छळ होय. कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष संपर्कात असणाऱ्या सहकारी पुरुषांकडून सतत टोचून बोलणे, निंदानालस्ती, अपमान व बेअब्रु होईल असे बोलणे, टोमणे मारणे, लज्जा उत्पन्न करणारे शब्द व हावभाव करणे आशा कृत्यांचा समोवश होतो. याशिवाय टेलिफोन, मोबाईलच्या माध्यमातून बोलणे, संदेश पाठविणे, सोशल मिडियाद्वारे संदेश, चित्रे पाठविणे, अशा वारंवार होणाऱ्या गोष्टींमुळे स्त्रीयांना मानसिक ताण-तणावांना सामोरे जावे लागते. परिणामी सतत चिंताग्रस्त राहणे, वैफल्यग्रस्त बनणे, कामात लक्ष न लागणे अशा बाबींना सामोरे जावे लागते. अनेक वेळा मानसिक छळ प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे होत असतो त्यामुळे त्यास पुरावा नसणे परिणामी अशा छळाविरोधी तक्रार करता येत नाही. यामुळे स्त्रीया सतत मानसिक व भावनिक तणावाखाली राहत असतात.
2) **शारीरिक छळ :-** जे वर्तन स्त्रीयांना शारीरिक त्रास यातना किंवा वेदना देते त्या वर्तनास शारीरिक छळ म्हणता येईल. यात प्रामुख्याने स्त्रीयांना अवघड अशी शारीरिक कष्टाची कामे देणे, जोखमीचे काम करावयास भाग पाडणे, स्त्रीयांना अशा कामात लागणारे सहकार्य न करणे, प्रत्येक कामाच्या बाबतीत स्त्रीला कामचुकार व अकार्यक्षम ठरविणे यासारख्या कृत्यांचा समावेश होतो. याबरोबरच कामाच्या ठिकाणी स्त्रीयांसाठी पुरेशी स्व्छतागृहे, विश्रामगृहे अशा सुविधा दिल्या जात नाहीत. यामुळे देखील शारीरिक त्रास स्त्रीला सहन करावा लागतो. सहकारी पुरुष मंडळीकडून दिलेले अतिरिक्त काम व असुरक्षिततेमुळै स्त्रीया शारीरिकदृष्ट्या कमकुवत होतात.
3) **आर्थिक छळ :-** कामाच्या ठिकाणी स्त्रीयांचे आर्थिक नुकसान होईल, कामाचा मोठा मोबदला मिळणार नाही असे कोणतेही वर्तन म्हणजे आर्थिक छळ होय. साधारपणे स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन देण्याचे तत्व सर्वच देशांनी मान्य केलेले आहे. भारतीय राज्यघटनेत स्त्री-पुरुष समानतेचे तत्व मन्य केलेले आहे. तथापी प्रत्यक्ष व्यवहारात हे तत्व पाळले जात नाही.

शासकीय सेवामधील स्त्रीयांचा अपवाद वगळता संघटीत व असंघटीत क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करुनही स्त्रीयांना पुरुषांइतके वेतन दिले जात नाही.

4) **लैंगिक छळ :-** साधारणपणे मानसिक छळ, शारीरिक छळ व आर्थिक छळाच्या तुलनेत होणारा लैंगिक छळ सर्वांसाठी मानहानीकारक असतो. सार्वजनिक ठिकाणीच्या वर्तनविषयक सभ्यतेच्या किंवा नैतिकतेच्या नियमांचा भंग करुन स्त्रीयांना दिली जाणारी वागणूक म्हणजेच लैंगिक छळ होय. जेंव्हा एखादी व्यक्ती बोलणे, कृती, स्पर्श या स्वरुपात लैंगिक कार्य अथवा उदेशाने एखाद्या महिलेला त्रास देते तेंव्हा त्याला लैंगिक छळ म्हटले जाते. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रीयांच्या छळाचे विविध प्रकारात स्त्रीयांचा होणारा शारीरिक छळ संमिश्र असू शकतो. मानसिक छळ हा शारीरिक त्रासाला कारणीभूत ठरू शकतो तर आर्थिक आणि छळाचे भयंकर टोक म्हणून लैंगिक छळाकडे आपण पाहू शकतो. लैंगिक छळामुळे आर्थिक, शारीरिक, मानसिक पातळीवर स्त्रीचा छळ होतो त्यामुळे स्त्रीला कामाच्या ठिकाणी अशा विविध छळांना सामोरे जावे लागत आहे.

**कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रियांच्या छळावर केलेली उपाययोजना:-**

कामाच्या ठिकाणी वातावरण सुरक्षित आणि निकोप असणे गरजेचे आहे. त्यासाठी जगातील सर्वच देशात कायदेशीर तरतूदी केलेल्या आढळतात. भारतातदेखील राज्यघटना, महिला आयोग, विशाखा मार्गदर्शक तत्त्वे व कार्यस्थळी स्त्रीयांच्या लैंगिक छळ अधिनियम 2013 नुसार विविध उपाययोजना केलेल्या आहेत.

**अ) राज्यघटना उपाय : -** कलम 376, कलम 509 या तरतूदी महिलांच्या छळास प्रतिबंध करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**1) मुलभूत हक्क :-** भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते 35 अंतर्गत पुरुषाप्रमाणेच स्त्रीयांसाठी समतेचा हक्क, स्वातंत्र्याच्या हक्क, शोषणाविरुध्दचा हक्क, धार्मिक स्वातंत्र, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क, आणि घटनात्मक उपाय योजनांचे हक्क असे सहा मुलभूत हक्क दिले आहेत, त्यात कलम 14 नुसार कायद्यापुढे सर्व व्यक्तींना समान मानले जाते. कलम 15 नुसार राज्य हे धर्म, वंश, जात, जन्मस्थळ आणि लिंग या आधारे नागरिकांना भेदभाव करणार नाही. कलम 21 नुसार प्रचलित कायद्याने प्रस्थापित केलेल्या पध्दतीला सोडून इतर कोणत्याही पध्दतीने व्यक्तीचे जीवित व वैयक्तिक स्वातंत्र हिरावून घेतले जाणार नाही. कलम 23 नुसार मानवाला पूर्वापार – करण्यास व वेठबिगारी करण्यास बंदी घातलेली आहे. या घटनात्मक तरतुदी स्त्रीयांच्या छळास प्रतिबंध करु शकतात.

**2) मार्गदर्शक तत्त्वे :-** राज्यघटनेच्या चौथ्या भागात 36 ते 51 कलमांतर्गत जी मार्गदर्शक तत्तवे दिलेली आहेत त्यात कलम 39 नुसार स्त्री-पुरुषांना समान कामास समान वेतन, कलम 42 नुसार राज्याने कायदयाच्या बाबतीत न्याय व माणुसकी वातावरण निर्माण करावे तसेच बाळंतपणासाठी स्त्रीयांना मदत दयावी अशी तरतूद केलेली आहे. या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी सरकारने समान वेतन अधिनियम 1976 आणि प्रसुति लाभ अधिनियम 1961 असे कायदे संमत केले आहेत वरील तरतूदी स्त्रीयांच्या छळास प्रतिबंध करण्यासाठी उपयुक्त आहेत.

**3) भारतीय दंडसंहितेतील तरतुदी :-** भारतीय दंडसंहितेत स्त्रीयांच्या छळास रोखण्यासाठी पुढील तरतुदी केलेल्या आहेत कलम 354, कलम 376, कलम 509 या तरतूदी महिलांच्या छळास प्रतिबंध करण्यासाठी महत्तवपूर्ण आहेत.

ब) महिला आयोग:

स्त्रियांच्या सर्वांगीण संरक्षणासाठी केंद्र सरकारने 1992 मध्ये राष्ट्रीय महिला आयोग स्थापन केले आहे. आयोगाची प्रमुख कार्य खालील प्रमाणे.

1) स्त्रियांच्या संरक्षणासाठी केलेल्या घटनात्मक तरतुदींचा अभ्यास करून त्यावर देखरेख ठेवणे व त्याचे पुनरावलोकन करून त्यात दुरुस्त्या करणे.
2) स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासंबंधीच्या बाबींचे संशोधन करणे.
3) स्त्रियांच्या हक्कावर आक्रमण झाल्यास त्याची चौकशी करणे.
4) स्त्रियांच्या तक्रारी सोडविण्यासाठी केलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर योग्य कारवाई करणे.
5) स्त्रियांचा सन्मान वाढविण्यासाठी जनजागृती करणे.

**क) विशाखा मागदर्शक तत्त्वे :-** कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्या होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी भारतातील सर्वोच्च न्यायालयाने 1997 मध्ये जी मार्गदर्शक तत्तवे घालुन दिली त्यांना विशाखा मार्गदर्शक तत्त्वे असे म्हणतात.

1. स्त्रीयांच्या सुरक्षेसाठी प्रर्याप्त उपाय योजना करणे ही केंद्र सरकार व राज्य सरकार यांची जबाबदारी आहे.
2. कार्यस्थळी स्त्रीयांच्या अस्मितेचे संरक्षण करणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे.
3. कार्यस्थळी होणाऱ्या स्त्रीयांच्या लैंगिक छळास प्रतिकार व्हावा या उद्देशाने केलेल्या नियमांबाबत लोकांना माहिती व्हावी यासाठी हे नियम प्रदर्शित करावेत.
4. स्त्रीयांना कामावर ठेवणारी व्यक्ती खाजगी अथवा – क्षेत्रातील असो त्यांना विशाखा मार्गदर्शक तत्तवे लागू राहतील.
5. स्त्रीयांच्या लैंगिक छळाची चौकशी करण्यासाठी तक्रार समिती स्थापन करणे आवश्यक आहे. या समितीचे अध्यक्षपद एका स्त्रीकडेच असावे तसेच निम्मे सदस्य स्त्रिया असल्ज्या पाहिजेत.
6. ऑक्टोबर 2012 मध्ये विशाखा मार्गदर्शक तत्त्वाचा विस्तार करण्यात आला. त्यानुसार – 'कौन्सिल ऑफ इंडिया' आणि 'मेडिकल कॉन्सील ऑफ इंडिया' या दोन्ही संस्थांनीही कार्यस्थळी होणाऱ्या स्त्रियांचा लैंगिक छळ थांबविण्यासाठी समिती स्थापन करण्यात असा आदेश दिला.

**ड) कामाच्या ठिकाणी महिला लैंगिक छळ (प्रतिबंध मनाई व निवारण अधिनियम - 2013)**

**Sexual Harassment At Workplace (Prevention Prohibition and Redreseal Act 2013)**

हा कायदा कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळ बेकायदेशीर ठरवतो.

कायदा लैंगिक छळाचे विविध प्रकार ओळखतो आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची तक्रार कशी करावी स्पष्ट करतो.

कोणत्याही कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ झालेल्या प्रत्येक महिलेसाठी हा कायदा बनवण्यात आला आहे. या कायद्यात हे आवश्यक नाही ही महिला त्या ठिकाणी नोकरी करत असावी, जिथे तिचा छळ झाला आहे. कामाचे ठिकाण कोणतेही कार्यालय असू शकते, मग ती खाजगी संस्था असो किंवा सरकारी

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2501I1VXIIIP0005

e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
JAN-2025
Issue–I, Volume–XIII

**निष्कर्ष :-**

कामाच्या ठिकाणी उच्चशिक्षीत महिलांना मानसिक, शारीरिक, आर्थिक व लैंगिक छळाच्या सामोरे जावे लागते ही एक गंभीर समस्या आहे. ज्याचा महिलांना त्यांच्या खाजगी जीवनात अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. ज्याचा त्या महिलेच्या मानसिक, शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. भारतात अशा छळाचे निराकरण करण्यासाठी आणि रोखण्यासाठी कायदेशीर तरतुदी आणि यंत्रणा आहेत. जेणेकरुन नोकरदार महिला सुरक्षित आणि आदारयुक्त वातावरणात काम करु शकतील. आज उच्च शिक्षण घेणारे विदयार्थी व समाजातील स्त्री, पुरुष हे या कायदयांबद्दल जागरुक असणे आणि कामाच्या ठिकाणी सर्व व्यक्तीच्या सन्मानाचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी अशा प्रकारच्या अन्यायाचा सामना करता यायला हवे.

**संदर्भ :-**

1) आदिती शर्मा कामाच्या ठिकाणी मानसिक छळ : भारतातील त्याचे परिणाम आणि कायदेशीर सुरक्षा समजून घेणे (Jotwani.com).
2) (Indiankanoon.com) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध आणि निवारण) कायदा 2013.
3) https://mscn.org.in
4) कायदेविषयक जनजागृतीसाठी – महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची पुस्तकमालिका.
5) http://www.goethena.com, 18 Jan 2023.
6) कामाच्या ठिकाणी छळाचे 6 प्रकार आणि त्यांची तक्रार कशी करावी.
7) Youtubevideo.कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा छळ आणि त्यावरील उपाय – अरुणा सबाने, 29/08/2021.